क्र. पोअय/वाचक/नवीन तीन कायदे /२०२५/1197
कार्यालय पोलीस अधीक्षक यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 24 APR 2025

**संदर्भ :-** पोमसं/२३/५४/नवीन तीन कायदे/८५/२०२५ दि.११.०४.२२०२२५

**विषय :-** नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत.

--००--

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये, नवीन फौजदारी कायदे दि.01.07.2024 पासुन अंमलात आले आहेत. मा. पोलीस महासंचालक,म.रा. मुंबई यांनी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच सर्व ठाणेदार यांना नवीन फौजदारी कायद्यांमधील तरतुदींबाबत जागरूकतेविषयी पत्रक प्राप्त असून ते खालील प्रामणे.

1) तपास पुर्ण झालेनंतर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी संबंधित दंडाधिकाऱ्यांना इलेक्ट्रॉनिक संप्रेपणासह अहवाल पाठवेल त्या अहवालाचा फॉर्म :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 193 (3)(i)

2) गुन्हयांचे स्वरूप आणि गांभीर्य लक्षात घेऊन अटक करतांना किंवा न्यायालयात हजर करतांना हातकडी वापरण्याबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 43 (3)

3) खाजगी व्यक्तीने अटक केलेल्या व्यक्तीला 6 तासांच्या आत पोलीसांच्या स्वाधीन करणे :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 40.

4) बलात्कार पिडीतेचा वैद्यकीय तपासणी अहवाल डॉक्टरांनी 07 दिवसांच्या आत निर्गमित करावा :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 184(6).

5) आत्महत्या इ. बाबतचा पोलीस तपास अहवाल 24 तासांच्या आत जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे पाठवावा :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 194

6) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत किंवा इतर कोणत्याही कायद्यानुसर दहा वर्ष किंवा त्याहून अधिक कारावास/ आजीवन कारावास/मृत्यू शिक्षेसह शिक्षेस पात्र ठरविण्यात आले आहे अशा व्यक्तीस घोषित अपराधी म्हणुन घोषित करणेबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 84 (4)

7) नवीन तरतुदींनुसार घोषीत व्यक्तीच्या विदेशातील मालमत्तेची ओळख पटवणे आणि संलग्न करणे शक्य आहे. :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 86

8) गुन्हेगारी कृत्यातून प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे मिळालेल्या मालमत्तेची संलग्नीकरण, जप्ती किंवा परतावा यासंबंधी नवीन तरतूद :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 107

९) सार्वजनिक उपद्रवांच्या प्रकरणांशी संबंधित प्रक्रिया दंडाधिकाऱ्यांव्दारे 90 दिवसांच्या आत पूर्ण केल्या जातील ज्या 120 दिवसांपर्यंत वाढवल्या जाऊ शकतात :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 157 (3)

१०) प्रभारी अधिकारी एफआयआर नोंदवण्यास नकार देत असल्यास दंडाधिकाऱ्यांना अर्ज करण्यापूर्वी पोलिस अधीक्षकांनी तक्रार निकाली काढण्याच्या प्रक्रियेबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १७३ (४)

११) १५ वर्षाखालील/ ६० वर्षावरील व्यक्ती/महिला/मानसिक/शारिरिकदृष्टया अपंग/गंभीर आजाराने ग्रस्त असलेले व्यक्तींचा जबाब ते राहत असलेल्या ठिकाणी घेणेबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 179

१२) लैंगिक गुन्हयांशी संबंधित प्रकरणांमध्ये,पिडीत महिलेचा जबाब महिला दंडाधिकारी यांनी नोंदविणे किंवा तिच्या अनुपस्थितीत पुरुष दंडाधिकारी यांनी महिलेच्या समक्ष घेतला पाहिजे :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 183(6)

१३) आरोपपत्र सादर करताना आरोपीला अटक करण्याचे बंधन काढून टाकणारी सुरक्षेची तरतूद :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 190

१४) व्यक्तींना समन्स पाठविण्याचा अधिकार :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 195(1)

१५) आरोपीला पोलिस अहवालाची प्रत (14 दिवसांच्या आत) :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 230

१६) काही प्रकरणांमध्ये (बदली/निवृत्ती/अनुपलब्धता) सार्वजनिक सेवक, तज्ञ आणि पोलिस अधिकारी यांनी तयार कलेल्या कागदपत्रे/अहवालांच्या संबधातील पुरावा :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 336

केवळ वादाच्या प्रसंगी लोकसेवक,विशेषज्ञ आणि अधिकारी यांना समक्ष साक्ष बोलावणे आणि व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुरावे देण्याबाबत.

१७) तपासादरम्यान अटक न करता नमुने किंवा नमुने देण्याबाबत दंडाधिकात्यांनी सकारात्मक आदेश देण्याबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम 349

तरी जिल्हयातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व शाखा प्रभारी अधिकारी हे त्यांचे अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांना अवगत करतील व परिपत्रकात दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी करून घेतील.

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी हे उक्त परिपत्रकातील सर्व तरतुदी बाबत अधिनस्त प्रभारी अधिकारी तसेच दुय्यम अधिकारी/ अंमलदार यांना मार्गदर्शन करून प्रभावी अंमलबजावणी करून घेतील.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक , यवतमाळ

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी,यवतमाळ जिल्हा,सर्व ठाणेदार यवतमाळ जिल्हा, सर्व शाखा प्रभारी अधिकारी,पो.अ.कार्यालय यवतमाळ.पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष, यवतमाळ,पोलीस उपअधिक्षक (मुख्या),यवतमाळ,रा.पो.नि.पो.मु. यवतमाळ.तसेच सर्व प्रभारी अधिकारी शाखा,यवतमाळ.याना परिपत्रकाचे अनुषंगाने उचीत कार्यवाहीकरीता

प्रत - अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
प्रत सविनंय सादर - मा.विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती.परिक्षेत्र,अमरावती.

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

अतितात्काळ

क्र.पोमसं/२३/५४/नवीन तीन कायदे/८५/२०२४ गुंबई, दिनांक : ११ /०४/२०२५

**विषय :- नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत.**

*****

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, नवीन फौजदारी कायदे दि.०१/०७/२०२४ पासून अंमलात आले आहेत. सर्व पोलीस घटकांकडून त्याची अंमलबजावणी केली जात आहे. तथापि, या नवीन फौजदारी कायद्यांमधील खालील तरतुदींबाबत जागरुकतेची आवश्यकता आहे.

१) तपास पुर्ण झालेनंतर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी संबंधित दंडाधिकाऱ्यांना इलेक्ट्रॉनिक संप्रेषणासह अहवाल पाठवेल त्या अहवालाचा फॉर्म :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९३ (३) (i)

२) गुन्हयांचे स्वरुप आणि गांभीर्य लक्षात घेऊन अटक करतांना किंवा न्यायालयात हजर करतांना हातकडी वापरण्याबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४३ (३)

३) खाजगी व्यक्तीने अटक केलेल्या व्यक्तीला ६ तासांच्या आत पोलीसांच्या स्वाधीन करणे :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४०

४) बलात्कार पीडितेचा वैद्यकीय तपासणी अहवाल डॉक्टरांनी ०७ दिवसांच्या आत निर्गमित करावा :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १८४(६)

५) आत्महत्या इ. बाबतचा पोलीस तपास अहवाल २४ तासांच्या आत जिल्हा दंडाधिका-यांकडे पाठवावा :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४

६) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता अंतर्गत किंवा इतर कोणत्याही कायद्यानुसार दहा वर्षे किंवा त्याहून अधिक कारावास/आजीवन कारावास/मृत्यू शिक्षेसह शिक्षेस पात्र ठरविण्यात आले आहे अशा व्यक्तीस घोषित अपराधी म्हणुन घोषित करणेबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ८४ (४)

७) नवीन तरतुदींनुसार घोषित व्यक्तीच्या विदेशातील मालमत्तेची ओळख पटवणे आणि संलग्न करणे शक्य आहे :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ८६

८) गुन्हेगारी कृतीतून प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे मिळालेल्या मालमत्तेची संलग्नीकरण, जप्ती किंवा परतावा यासंबंधी नवीन तरतूद :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १०७
यामध्ये गुन्हयामुळे बाधित झालेल्या लोकांना ते प्रमाणानुसार वाटप करण्याबाबत नमुद आहे.

९) सार्वजनिक उपद्रवांच्या प्रकरणांशी संबंधित प्रक्रिया दंडाधिकाऱ्यांद्वारे ९० दिवसांच्या आत पूर्ण केल्या जातील ज्या १२० दिवसांपर्यंत वाढवल्या जाऊ शकतात :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १५७ (३)

१०) प्रभारी अधिकारी एफआयआर नोंदवण्यास नकार देत असल्यास दंडाधिकाऱ्यांना अर्ज करण्यापूर्वी पोलिस अधीक्षकांनी तक्रार निकाली काढण्याच्या प्रक्रियेबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १७३ (४)

११) १५ वर्षाखालील / ६० वर्षावरील व्यक्ती / महिला / मानसिक / शारीरिकदृष्टया अपंग / गंभीर आजाराने ग्रस्त असलेले व्यक्तींचा जबाब ते राहत असलेल्या ठिकाणी घेणेबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १७९

१२) लैंगिक गुन्हयांशी संबंधित प्रकरणांमध्ये, पीडित महिलेचा जबाब महिला दंडाधिकारी यांनी नोंदविणे किंवा तिच्या अनुपस्थितीत पुरुष दंडाधिकारी यांनी महिलेच्या समक्ष घेतला पाहिजे:- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १८३ (६)

१३) आरोपपत्र सादर करताना आरोपीला अटक करण्याचे बंधन काढून टाकणारी सुरक्षेची तरतूद :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९०

१४) व्यक्तीना समन्स पाठविण्याचा अधिकार :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९५ (१)
१५ वर्षाखालील किंवा ६० वर्षापेक्षा जास्त वयाची व्यक्ती किंवा स्त्री किंवा मानसिक किंवा शारीरिक अपंगत्व किंवा गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तीच्या साक्षीबाबत प्रशासकीय आदेश.

१५) आरोपीला पोलिस अहवालाची प्रत (१४ दिवसांच्या आत) :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २३०

१६) काही प्रकरणांमध्ये (बदली/निवृत्ती/अनुपलब्धता) सार्वजनिक सेवक, तज्ञ आणि पोलिस अधिकारी यांनी तयार केलेल्या कागदपत्रे /अहवालांच्या संबंधातील पुरावा :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३३६
केवळ वादाच्या प्रसंगी लोकसेवक, विशेषज्ञ आणि अधिकारी यांना समक्ष साक्ष बोलावणे आणि व्हिडिओ कॉन्फरन्सव्दारे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुरावे देण्याबाबत.

१७) तपासादरम्यान अटक न करता नमुने किंवा नमुने देण्याबाबत दंडाधिकाऱ्यांनी सकारात्मक आदेश देण्याबाबत :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३४९

तरी, खालील घटक प्रमुखांनी उपरोक्त नमूद तरतुदींवर विशेष लक्ष द्यावे. तसेच, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस अधिकारी / अंमलदार यांना योग्य अंमलबजावणीसाठी याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

**(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे मान्यतेने)**

(डॉ. निखील गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था)

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य
अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे शाखा, महाराष्ट्र राज्य
अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र सायबर
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)